मनोज कापडे

मुलाखत

# वॉटर : जलसंधारण आणि ग्रामविकासाची प्रयोगशाळा

**देशाच्या पाणलोट विकासात गेले पाव शतक विविधांगी काम करणाऱ्या वॉटरशेड ऑर्गनायजेशन ट्रस्ट (वॉटर) या अशासकीय संस्थेने आता जलसंधारण व ग्रामविकासाचे काम सात राज्यांमधील चार हजार गावांपर्यंत नेले आहे. शेतकरी आणि शेती हाच केंद्रबिंदू ठेवून पाणलोट क्षेत्रविकास, ग्रामविकास, महिला सक्षमीकरणाचे काम करणाऱ्या 'वॉटर'ला २०१७ चा 'लँड फॉर लाइफ अॅवॉर्ड' हा आंतरराष्ट्रीय सन्मान मिळाला. 'वॉटर'चे कार्यकारी विश्वस्त क्रिस्पिनो लोबो यांच्याशी केलेली ही बातचीत.**

### महाराष्ट्राच्या पाणलोट चळवळीत फादर बाकर व क्रिस्पिनो लोबो ही दोन नावं सतत चर्चेत असतात...

देशात पाणलोटाची संकल्पनाच मुळात फादर बाकर यांनी रुजवली. ते द्रष्टे ग्रामसुधारक आहेत. फादर बाकर यांचे महाराष्ट्राच्या आणि देशाच्याही जलसंधारण चळवळीत मोठे योगदान आहे. बघा कुठे स्वित्झर्लंड आणि कुठे अहमदनगर जिल्हा. भारतीयांच्या प्रेमापोटी फादर १९४८ मध्ये स्वित्झर्लंडमधून भारतात आले. अहमदनगर जिल्ह्यातील ग्रामीण जनता आणि शेतकऱ्यांच्या उन्नतीसाठी त्यांनी ६० वर्षे नगर भागात काम केले. मीदेखील उच्चशिक्षण घेतलेले असतानाही फादरच्या ग्रामविकासाच्या चळवळीत १९७६ मध्ये ओढला गेलो. फादर बाकर व मी १९९३ मध्ये वॉटर संस्थेचे रोपटे लावले. ते अध्यक्ष होते आणि मी विश्वस्त. फादरनी उभे आयुष्य राज्याच्या जलसंधारणासाठी झिजवले आणि काहीही न घेता पुन्हा स्वित्झर्लंडला निघून गेले. आता ते ९४ वर्षांचे आहेत.

### अहमदनगर जिल्ह्यात फादर बाकर यांनी जलसंधारणाचे नेमके कोणते प्रयोग केलेत?

अहमदनगर जिल्हा काही दशकांपूर्वी दुष्काळाच्या वणव्यात सतत होरपळत होता. जगण्यासाठी शेतकरी स्थलांतर करीत. पाऊस व्हायचा; पण पाणी निघून जायचे. विहिरी, तळ्यांमध्ये पाणी साचत नसायचे. 'पाण्याचे संकट दूर करायचे असेल, तर आधी भूगर्भातील पाणीसाठा वाढवा. पावसाचे पाणी जमिनीत मुरवा,' असे सांगत बाकर यांनी मूलस्थानी जलसंधारणाची संकल्पना मांडली. ती प्रत्यक्षात अमलात आणण्यासाठी त्यांनी आयुष्य पणाला लावले. त्यांनी शेतकरी, गावकरी, राजकीय मंडळी या सर्वांना सोबत घेऊन जलसंधारणाचे प्रयोग केले.

विशेष म्हणजे शंकरराव चव्हाण, भाऊसाहेब थोरात, बाळासाहेब विखे पाटील, बाळासाहेब थोरात, नाबार्डचे तत्कालिन व्यवस्थापकीय संचालक एम.व्ही. गाडगीळ, प्रशासकीय अधिकाऱ्यांशी फादरनी संपर्क ठेवला. तेव्हाची भूविकास बँक, जिल्हा मध्यवर्ती बँक, तसेच जिल्हा प्रशासनाला त्यांनी चळवळीत सहभागी करून घेतले. लोकांचे जीवनमान उंचावण्यासाठी तुम्हाला पाण्याची समस्या आधी मिटवावी लागेल व त्यासाठी पडणारा पाऊस जमिनीत मुरवावा लागेल, असे सांगत बाकर यांनी नगरमध्ये भूमिगत बंधाऱ्यांची संकल्पना आणली. यात ओहोळ, नाल्यांच्या वाळूमध्ये खाली बंधारे बांधले जात असत. वाळूच्या वर फक्त एक-दोन फूट भिंत असायची व बाकीचा भाग भूमिगत असायचा. त्यामुळे पात्रात पाणी भरपूर मुरायचे. यामुळे लोकांच्या विहिरींचे पाझर वाढले. अनेक गावांची पाण्याची समस्या सुटली. फादर बाकर यांनी लोकांचे प्रबोधन करून त्या वेळी कर्ज काढून २०० उपसा जलसिंचन योजना उभारण्यास प्रवृत्त केले. त्याचा मोठा फायदा शेतीला झाला.

### पाणलोटाच्यासंदर्भात तुम्ही फादर बाकर यांच्यासोबत देशपातळीवर कोणती कामे केली?

देशाच्या अनेक भागांत सततच्या दुष्काळाची समस्या भेडसावत असे. त्यावर मात करण्यासाठी भूगर्भातील पाणीसाठा वाढवायला हवा असे सांगत आम्ही १९८६ मध्ये एकात्मिक जलसंधारण आणि पाणलोटाची सर्वंकष कामे होण्यासाठी सरकार दरबारी पाठपुरावा सुरू केला. डोंगरमाथा ते पायथा याच क्रमाने जलसंधारणाची कामे व्हावीत; तसेच त्यात वनीकरण, कुरणविकास, पाणी मुरण्यासाठी मातीबांध, दगडीबांध, गॅबियन बंधारे, सिमेंट बंधारे, पाझर तलाव अशी कामे करण्याचा संकल्प केला. माती हीच शेतीला आणि पाणी मुरवण्यासाठी उपयुक्त असल्यामुळे आम्ही 'माती अडवा- पाणी जिरवा' अशी संकल्पना मांडली. 'पाणी अडवा- पाणी जिरवा' किंवा 'नदीपात्र उकरत बसा' असे आम्ही सांगत नव्हतो. नदीपात्रात फक्त ५ टक्के पाणी मुरते; पण ९५ टक्के क्षेत्र नदी खोऱ्यात असते. तेथे माती थांबली पाहिजे आणि पाणी मुरले पाहिजे, असे आमचे म्हणणे होते. त्यातून फादर बाकर यांनी जर्मन सरकारशी बोलणी केली. त्यांना भारतातील जलसंधारणाची गरज समजावून सांगितली. जर्मन सरकार या विषयात भारताला मदत करण्यास राजी झाले. त्यानंतर फादर बाकर यांनी देशाचे तत्कालीन अर्थमंत्री शंकरराव चव्हाण यांना ही बाब पटवून दिली. त्यातून इंडो-जर्मन करार झाला व पुढे इंडो-जर्मन वॉटरशेड डेव्हलपमेंट अभियानाचा जन्म झाला. या अभियानासाठी 'नाबार्ड'कडे निधी येत होता; पण त्यात स्वयंसेवी संस्था नव्हत्या. या कामात स्वयंसेवी संस्था असावी म्हणून मग आम्ही वॉटर (वॉटरशेड ऑर्गनायझेशन ट्रस्ट) संस्था स्थापन केली.



क्रिस्पिनो लोबो

### 'वॉटर'च्या कामांची व्याप्ती किती आहे?

'वॉटर'ने नगर जिल्ह्याला जलसंधारण व ग्रामविकास कामांची प्रयोगशाळा मानून काम केले. कोणत्याही कामात किमान २० टक्के लोकवाटा असलाच पाहिजे असे ठरवले. लोकांचा सहभाग असेल तरच चळवळ यशस्वी होते. ही चळवळ पाण्याचे साठे तयार करण्यासाठी राबविण्यात आली. पाण्याची उग्र समस्या असल्यामुळेच शेतकरी कुटुंबात मुली पाणी आणण्याच्या, तर मुलं जनावरे सांभाळण्याच्या कामांत गुंतलेली असायची. आम्ही पाण्याचे साठे तयार करणे किंवा विहिरींना पाणी कसे उतरेल याकडे लक्ष दिले. त्यामुळे मुली शिकू लागल्या. मुलांसाठी शाळा उभ्या राहिल्या. संगमनेर तालुक्यात अशी काही गावे आम्ही विकसित केली आहेत. त्यानंतर मुख्यत्वे आम्ही इतरांना प्रशिक्षित करण्यावरच भर दिला. त्यातून आज महाराष्ट्र, मध्य प्रदेश, तेलंगण, आंध्र प्रदेश, राजस्थान, झारखंड, बिहार, ओरिसाच्या ४ हजार १२२ गावांमध्ये २७ लाख लोकांसाठी वॉटर काम करते आहे.

ग्रामविकास, पाणलोट विकास, नैसर्गिक साधनांचे बळकटीकरण, महिला सक्षमीकरण, बदलत्या हवामानाला तोंड देत शेती करणे, स्वयंसहायता गट, सूक्ष्म वित्तपुरवठा, क्षमता बांधणी, पर्यायी ऊर्जा, आरोग्य योजना, कुपोषणाविरुद्ध अभियान, शाळा व शाश्वत जगण्याची पद्धत, पीक सल्ला, ज्ञान व्यवस्थापन अशा विविध क्षेत्रांत सरकारच्या मदतीने आम्ही देशभर कामे करतो आहोत. या कामांची पावती म्हणजे 'वॉटर'ला दोन डझन पुरस्कार मिळाले आहेत. अलीकडेच युनायटेड नेशन कनव्हेन्शनचा २०१७ चा लँड फॉर लाइफ अॅवॉर्ड आम्हाला मिळाला. अर्थात, याचे सारे श्रेय 'वॉटर'च्या संपूर्ण टीमला व माझ्या सहकाऱ्यांनाच जाते.

### विदेशात करिअरची संधी असताना तुम्हाला महाराष्ट्रात ग्रामविकासाच्या कामांची ओढ का वाटली?

मला इतर कोणत्याही विषयापेक्षा ग्रामविकासाचे क्षेत्र अधिक भावते. शेतकरी हा माझा आवडीचा विषय आहे. मी प्राथमिक शिक्षण गोव्यात घेतले. पुढचे शिक्षण पुण्यात व उच्चशिक्षण दिल्लीत घेतले. त्यानंतर हार्वर्डला उर्वरित शिक्षण घेतले. मानसशास्त्र, तत्त्वज्ञान, देवशास्त्राच्या पदव्या मी घेतल्या आहेत. मी हार्वर्ड विद्यापीठातून पब्लिक अॅडमिस्ट्रेशनमध्ये पदव्युत्तर शिक्षण घेतले. हे सर्व करताना माझी नाळ ग्रामीण भागाशी कायम राहिली. माझ्यापेक्षा खेड्यातील माणूस शहाणा आहे हे मला समजले. मी सुटाबुटात शहरात राहातो आणि इंग्रजी बोलतो म्हणजे मी प्रगत आहे असे मी मानत नाही. ग्रामीण भागातील माणूस हाच मानसिकदृष्ट्या प्रगत असतो. तो जीवसृष्टीशी समरस राहून स्वतःचा विकास करण्याचा प्रयत्न करतो. त्याला थोडी मदत केल्यास त्याचे जगणे सुकर होते. मला तीच मदत करण्यात जास्त आनंद मिळतो. राज्यातील काही आत्महत्याग्रस्त भागातील कुटुंबांसाठी आम्ही काम करतोय. या कुटुंबांना त्यांच्या पायावर उभे करतोय. आमची काही कामे प्रसिद्धीपासून दूर असतात; पण आम्ही समाधान आणि आनंदाने सर्व काही करत असतो.

### 'वॉटर'चे पुढील संकल्प

**– देशातील प्रत्येक शेतकऱ्याला त्याच्या मागणीप्रमाणे कृषी सल्ला कसा मिळेल, यासाठी प्लॅटफॉर्म कसा तयार करता येईल, त्यात माहिती व तंत्रज्ञान, तसेच कृषी विद्यापीठे आणि कृषी विभागाला कसे सामावून घेता येईल याविषयी मी सतत विचार करतो आहे. सध्या आम्ही आयटी तंत्रज्ञांच्या मदतीने कृषिशास्त्रज्ञ व आयएमडीला सोबत घेऊन एक सॉफ्टवेअर तयार केले आहे. देशातील हा पहिला पथदर्शक प्रकल्प आहे. त्याच्या चाचण्या आयएमडीच्या मदतीने चालू आहेत. मोबाईलच्या माध्यमातून ५० लाख शेतकऱ्यांना पीक सल्ला पाठवला जातो आहे. अर्थात, आम्हाला मागणीनुसार प्रत्येक शेतकऱ्याला अचूक पीकसल्ला देणारी यंत्रणा उभारायची आहे. याशिवाय बदलत्या हवामानानुसार शाश्वत शेती कशी करता येईल याबाबत काही प्रयोग चालू आहेत. गटशेतीतून शेतकऱ्यांच्या कंपन्या तयार करण्याचे देखील काम सुरू आहे. अशा १६ कंपन्या आम्ही तयार केल्या आहेत. 'वॉटर'च्या कामाला सर्वंकष रूप देण्यावर आमचा भर राहील.**

☎ : ०२०-२४२१३५३०